आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१९ जून २०२५ - गुरूवार

**ठळक बातम्या**

- QS जागतिक विद्यापीठ क्रमवारीत देशातल्या ५४ विद्यापीठांचा समावेश, IIT मुंबईसह पुणे आणि मुंबई विद्यापीठ पहिल्या २० मध्ये

- दिल्ली उच्च न्यायालयाचे तत्कालीन न्यायाधीश यशवंत वर्मा यांना हटवण्यासाठी पुरेसे पुरावे असल्याचा न्यायालयीन समितीचा निष्कर्ष

- झारखंडमध्ये गेल्या २ दिवसात झालेल्या मुसळधार पावसामुळे १० जणांचा मृत्यू, २५ जण जखमी

- इराणचे आण्विक आणि संहारक क्षेपणास्त्र क्षमता नष्ट करण्याचं लक्ष असल्याचा इस्राइल प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू यांचा इशारा

**आणि**

- भारत आणि इंग्लंड यांच्यातली पाच सामन्यांची कसोटी क्रिकेट मालिका उद्यापासून

<><><><>

QS जागतिक विद्यापीठ क्रमवारीत ५४ भारतीय शैक्षणिक संस्थांना स्थान मिळालं आहे. यात IIT मुंबई, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठाचा समावेश आहे. देशपातळीवरील QS वर्ल्ड युनिव्हर्सिटी क्रमवारीत IIT दिल्लीनं अव्वल स्थान मिळवलं आहे.

QS जागतिक विद्यापीठ क्रमवारीनुसार जागतिक पातळीवर IIT दिल्लीनं १२३वा क्रमांक मिळवला आहे. आधीच्या क्रमवारीत IIT दीडशेव्या स्थानी होती. जागतिक पातळीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ५६६ व्या स्थानी आहे, तर मुंबई विद्यापीठ ६६४ व्या क्रमांकावर आहे. देशपातळीवर ही विद्यापीठे अनुक्रमे १५ व्या आणि १८ व्या स्थानी आहेत.

QS जागतिक विद्यापीठ क्रमवारीत भारतीय शैक्षणिक संस्थांचा समावेश झाल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आनंद व्यक्त केला आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी समाज माध्यमावर केलेल्या संदेशाला उत्तर देताना लिहिलं आहे की, QS जागतिक विद्यापीठ २०२६ अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर देशातील शैक्षणिक विश्वासाठी चांगली बातमी मिळाली आहे.

२०१४ मध्ये केवळ ११ भारतीय विद्यापीठांना QS क्रमवारीत स्थान होतं आता या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><>

नागरी विमान वाहतूक मंत्री राममोहन नायडू यांनी आज उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यांनी यावेळी विमानाची सुरक्षा, प्रवाशांसाठी सुविधा आणि विमान कंपन्यांच्या कामगिरीचा आढावा घेतला. नायडू यांनी देशभरातल्या विमानतळ संचालकांसोबत दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधला आणि प्रवाशांसाठीची मदत यंत्रणेचा आढावा घेतला. विमान उड्डाणाला विलंब असेल तर विमानतळावर अन्न, पाणी आणि बसण्याची सुविधा देण्याचे निर्देश नायडू यांनी यावेळी दिले. प्रवाशांच्या तक्रारींचं निवारण करण्यासाठी मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासही नायडू यांनी संचालकांना सांगितलं. नागरी विमान वाहतूक मंत्र्यांनी एअर इंडियाच्या व्यवस्थापकीय संचालकांसोबतही बैठक घेतली. प्रवाशांची सोय आणि सुरक्षा यावर लक्ष केंद्रित करण्याबाबत यावेळी चर्चा झाली.

<><><><>

केंद्रीय आदिवासी व्यवहार मंत्रालय एम्स रुग्णालयाच्या सहकार्यानं सिकलसेल रोगावर औषध निर्माण करण्यासाठी एक स्पर्धा आयोजित करत आहे. या स्पर्धेतून निवडलेल्या औषध निर्मिती प्रकल्पाला दहा कोटीपर्यंत निधी दिला जाईल. दिल्लीमधल्या एम्स रुग्णालयात जागतिक सिकलसेल दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना आदिवासी व्यवहार राज्यमंत्री दुर्गादास उईके यांनी ही घोषणा केली. २०४७ पर्यंत देशातून सिकलसेल रोगाचं उच्चाटन होईल, असं उईके यावेळी म्हणाले.

<><><>

दिल्ली उच्च न्यायालयाचे तत्कालीन न्यायाधीश यशवंत वर्मा यांना पदावरून हटवण्याची प्रक्रिया सुरू करण्यासाठी पुरेसे पुरावे असल्याचा निष्कर्ष याप्रकरणी नेमलेल्या न्यायालयीन समितीनं काढला आहे. न्यायमूर्ती वर्मा यांच्या निवासस्थानी रोख रक्कम आढळल्याचा आरोप आहे. आपल्याला अडकवण्यासाठी हे प्रकरण उभं केलं असल्याचा वर्मा यांचा दावा समितीनं अमान्य केला आहे. न्यायमूर्ती वर्मा त्यांच्या निवासस्थानी आढळलेल्या रक्कमेचा हिशेब देऊ शकले नाहीत, असं समितीनं नमूद केलं आहे.

<><><>

चार राज्यांमधल्या ५ विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुकीसाठी आज मतदान झालं. त्यात संध्याकाळी साडे पाच वाजेपर्यंत, गुजरातमधल्या विसवदर आणि काडी या मतदारसंघांमधे ५४ टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झालं. केरळमधल्या निलंबुर मतदारसंघात सुमारे ७० टक्के, पश्चिम बंगालमधल्या कालीगंज मतदारसंघात ६९ टक्के, तर पंजाबमधल्या लुधियाना मतदार संधात सुमारे ४९ टक्के, मतदान झालं.

या पाचही मतदारसंधांमधली मतमोजणी येत्या सोमवारी होणार आहे.

<><><>

मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी काल २४ किलोपेक्षा जास्त वजनाचा गांजा जप्त केला. थायलंडमधून तस्करी करून आणलेल्या या गांजाची बेकायदेशीर बाजारपेठेत अंदाजे २४ कोटी ६६ लाख रुपये किंमत आहे. सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी या प्रकरणी तीन जणांना अटक केली आहे. अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीचा या गुन्ह्यात सहभाग असल्याचं प्राथमिक तपासात आढळून आलं आहे.

<><><>

झारखंडमध्ये गेले दोन दिवस सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे आतापर्यंत १० जणांचा मृत्यू झाला, तर २५ जण जखमी झाले.

पुराच्या पाण्यात अनेक पूल वाहून गेले असून, अनेक घरांचं नुकसान झालं आहे. सखल भाग पाण्याखाली गेले आहेत, त्यामुळे बचाव कार्यासाठी एनडीआरएफ ची पथकं तैनात करण्यात आली आहेत.

रांची, हजारीबाग, रामगड, जमशेदपूर, छत्रा आणि सिमडेगा यासारख्या शहरी भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचलं आहे, तर ग्रामीण भागात पायाभूत सुविधांचं नुकसान झालं आहे. पुरात अडकलेल्या नागरिकांची सुटका करण्यासाठी अनेक ठिकाणी एनडीआरएफची पथकं तैनात करण्यात आली आहेत.

<><><>

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त २१ जूनला सकाळी साडे ५ वाजता उरणला जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटीच्या टाऊनशिपमध्ये योग संगम कार्यक्रम होणार आहे. यात दहा हजार नागरिकांचा सहभाग अपेक्षित आहे. या कार्यक्रमाअंतर्गत “हरित योग” आणि “योगा पार्क” या संकल्पनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यात वृक्षारोपणालाही विशेष प्राधान्य देण्यात आले असून, केवळ जे.एन.पी.ए.मध्ये १ लाखापेक्षा अधिक वृक्षारोपण करण्यात आलं आहे.

<><><>

इराणची आण्विक आणि संहारक क्षेपणास्त्र क्षमता नष्ट करण्याचं इस्राइलचं लक्ष असल्याचा इशारा इस्राइलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू यांनी दिला आहे. देशाला केलेल्या संबोधनात त्यांनी हा इशारा दिला. तर इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खोमेनी यांना हटवणं हे इस्राइलचं मूळ उद्दिष्ट असल्याचं इस्राइलचे संरक्षण मंत्री इस्राइल कात्झ सांगितलं.

इराणनं इस्राइलमध्ये विविध ठिकाणी हल्ला केला. त्यात एका रुग्णालयाचाही समावेश आहे. या हल्ल्यात १३७ नागरिक जखमी झाल्याचं स्थानिक वृत्तसंस्थेनं सांगितलं. हे आंतरराष्ट्रीय करारांचं उल्लंघन असल्याचं सांगत इस्राइलनं या निर्णयाचा निषेध केला आहे. इस्रायली सैन्यानं इराणच्या अरक हेवी वॉटर न्यूक्लियर रिऍक्टर वर हल्ला केल्याचं वृत्त आहे.

या युद्धात अमेरिकी सैन्य उतरवण्याच्या मुद्द्यावर राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मौन बाळगलं आहे. या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर इस्राइल मधल्या अमेरिकन दूतावासानं आपल्या कर्मचाऱ्यांना सुरक्षित ठिकाणी आश्रय घेण्याचे निर्देश दिले आहेत. जगभरातल्या मुस्लिम बहुल २४ देशांनी इस्राइलच्या हल्ल्याचा निषेध करणारं संयुक्त पत्रक प्रसिद्ध केलं आहे.

<><><>

भारत आणि इंग्लंड यांच्यात पाच सामन्यांची कसोटी क्रिकेट मालिका उद्यापासून सुरू होणार आहे. इंग्लंडमध्ये लीडस् इथं हेडिंग्ले क्रिकेट मैदानावर पहिला सामना उद्या सुरू होईल. विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्या निवृत्तीनंतर, भारतीय संघ शुभमन गीलच्या नेतृत्त्वाखाली पहिल्यांदाच ही मालिका खेळणार आहे.

<><><>

लंडन इथं झालेल्या जागतिक ब्लिट्ज बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेच्या उपांत्य फेरीत विजयी ठरलेली भारतीय बुद्धीबळपटू दिव्या देशमुख हिचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज अभिनंदन केलं. दिव्यानं या सामन्यात अग्रस्थानावर असलेल्या होऊ यिफान हिला पराभूत केलं. दिव्या सारख्या प्रतिभावंत खेळाडूमुळे अनेकांना प्रेरणा मिळत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. भविष्यात दिव्यानं असंच यश मिळवावं, अशा शुभेच्छा ही त्यांनी दिल्या आहेत.

<><><>

हॉकी इंडिया मास्टर्स कप स्पर्धेत गट क सामन्यात महाराष्ट्रानं मणिपूरविरूद्ध ७-१ अशी आघाडी घेतली आहे. याआधी गट ब सामन्यात हरियाणानं तमिळनाडू संघाचा ८-४ असा पराभव केला. तर ओदिशानं पंजाबचा १-३ असा पराभव केला. कट क मधे ओदिशाचा सामना पुद्दुचेरीशी आज रात्री होणार आहे.

<><><>

गेल्या पाच वर्षांत जागतिक पातळीवर वीज उत्पादन करणारा भारत तिसऱ्या क्रमांकाचा देश ठरला आहे. चीन आणि अमेरिका हे अनुक्रमे पहिल्या आणि दुसऱ्या स्थानावर आहेत.व्यावसायिक आणि घरांमध्ये वापरले जाणारे वातानुकुलन यंत्र तसंच इतर विद्युत उपकरणांचा वाढता वापर तसंच उद्योगक्षेत्राकडून वाढत्या विजेच्या मागणीमुळेही उत्पादनात वाढ झाल्याचं आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्था -IEA च्या अहवालात नमूद केलं आहे.

//<><><><>//